
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उपसंपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | सोमवार, 15 जून 2026 |
अंक क्र. 42 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईची परळीत दहशत



## गुटखा माफियांवर मकोकाचा इशारा, अनेक पानटपऱ्या बंद

**परळी, प्रतिनिधी -**

राज्यभर अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवायांमुळे चर्चेत असलेले आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा माफियांविरोधात मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कठोर कारवाईचा इशारा दिल्यानंतर बीड जिल्ह्यातील परळी शहरात त्याची मोठी दहशत निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. आज सकाळपासूनच आयुक्त मुंढे यांचे विशेष पथक परळीत दाखल झाल्याची चर्चा शहरात रंगली आणि त्यानंतर अनेक अवैध गुटखा विक्री करणाऱ्या पानटपऱ्या तसेच विनापरवानाधारक व्यावसायिकांनी आपली दुकाने बंद ठेवल्याचे दिसून आले.

राज्यात भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि अवैध गुटखा विक्रीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला आणखी तीव्र करत आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत गुटखा माफियांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा दिला होता. तसेच कोणतेही हॉटेल, किराणा दुकान, पानटपरी अथवा अन्य व्यावसायिक आस्थापना आवश्यक परवानग्यांशिवाय सुरू ठेवू नयेत आणि कोणत्याही प्रकारचे भेसळयुक्त पदार्थ विकू नयेत, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असेही त्यांनी बजावले होते.

मुंढे यांच्या या कठोर भूमिकेचे पडसाद परळी शहरातही उमटले असून, कारवाईच्या भीतीने अनेक ठिकाणी गुटखा विक्री करणाऱ्या पानटपऱ्या दिवसभर बंद असल्याचे दिसून आले. शहरात आयुक्तांच्या पथकाच्या आगमनाची चर्चा सुरू असतानाच काही व्यावसायिकांनी सावध पवित्रा घेतल्याचे चित्र होते.

दरम्यान, अवैध गुटखा विक्री आणि भेसळयुक्त पदार्थांवर अंकुश आणण्यासाठी प्रशासनाची मोहीम अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत मिळत असून, आगामी काळात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## अध्यात्म, योग व समाजप्रबोधन क्षेत्रातील कार्याची दखल; सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांना 'कीर्ती सुधाकर' पुरस्कार जाहीर

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

अध्यात्म, योग, समाजप्रबोधन आणि मानवकल्याण क्षेत्रात अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने कार्य करणारे श्री. प.पू. १०८ सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज, सारखखेर्डा यांना प्रतिष्ठेचा 'कीर्ती सुधाकर' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

श्री जगद्गुरू विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प.पू. श्रीमद् काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी तसेच प.पू. श्रीमद् काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आदेशानुसार हा सन्मान जाहीर



करण्यात आला आहे.

सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी अध्यात्म, योग साधना, समाजप्रबोधन व मानवसेवा या क्षेत्रांत केलेले उल्लेखनीय कार्य प्रेरणादायी व अभिमानास्पद असल्याने त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री जगद्गुरू पंचाचार्यांच्या दिव्य सान्निध्यात अक्कलकोट रोडवरील बृहन्मठ हॉटेल, वीरशैवपीठ मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात उपस्थित राहून पुरस्कार स्वीकारण्याचे निमंत्रण शिवाचार्य महाराज यांना देण्यात आले आहे.

या सन्मानामुळे सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या सामाजिक, आध्यात्मिक व मानवकल्याणाच्या कार्याला राष्ट्रीय पातळीवर गौरव प्राप्त झाला असून त्यांच्या अनुयायी व भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## डायमंड फुटवेअर कारखान्याच्या नुकसानीची खासदार बप्पा सोनवणे यांनी घेतली माहिती ; उमेर जाफर यांना दिला धीर

**परळी, प्रतिनिधी :**

सामाजिक कार्यकर्ते सय्यद उमेर जाफर यांच्या डायमंड फुटवेअर कारखान्याला दि. ३ मे रोजी भीषण आग लागून मोठे आर्थिक नुकसान झाले होते. या घटनेनंतर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी तत्काळ दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांना धीर दिला होता.

दरम्यान, आज परळी दौऱ्यावर असताना खासदार बप्पा सोनवणे यांनी सय्यद उमेर जाफर यांच्या निवासस्थानी भेट देऊन कारखान्यात झालेल्या नुकसानीची सविस्तर माहिती घेतली तसेच त्यांची विचारपूस केली.

यावेळी त्यांनी, "यापेक्षाही अधिक चांगले आणि मोठे काम पुढे करा," असा प्रेरणादायी संदेश देत त्यांचे मनोबल वाढविले.

या घटनेची माहिती असूनही अनेक स्थानिक लोकप्रतिनिधी व नेतेमंडळी भेटीस आली नसल्याची भावना व्यक्त करण्यात आली. मात्र, खासदार बप्पा सोनवणे यांनी फोनद्वारे संपर्क साधून तसेच प्रत्यक्ष भेट देऊन संवेदनशीलता आणि माणुसकीचे दर्शन घडविल्याची प्रतिक्रिया उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली. यावेळी डॉ. देशमुख, शरीफभाई केज, असलम खान, विजय अंजान, सय्यद अब्बास, राजा खान यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



## महाराष्ट्रात मान्सूनची गती मंदावली; 12 जिल्ह्यांना उष्णतेचा तर 9 जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट

**मुंबईः वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील हवामानात पुन्हा मोठा बदल होत असून मान्सूनची प्रगती मंदावल्याने अनेक भागांत उष्णता आणि दमट वातावरणाचा त्रास वाढला आहे. अशात हवामान विभागाने 15 जूनसाठी राज्यातील 12 जिल्ह्यांना उष्णतेचा आणि 9 जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे.

**कोकणात उष्णता वाढणार**

कोकण विभागातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिर जिल्ह्यांसाठी उष्ण आणि दमट हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**उत्तर महाराष्ट्रात उष्णता आणि हलक्या पावसाची शक्यता**

नंदूरबार आणि जळगाव या जिल्ह्यांसाठी उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर नाशिक जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**पश्चिम महाराष्ट्रात दुहेरी परिस्थिती**

कोल्हापूर आणि सातारा येथे उष्णतेचा यलो अलर्ट आहे. तर सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज असून ताशी 30 ते 40 किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. पुणे जिल्ह्यातही काही भागांत हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो.

छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर परभणी, बीड, हिंगोली,नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे.

विदर्भात पावसाचा इशारा अमरावती जिल्ह्यासाठी उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ येथे मेघगर्जनेसह वादळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांत ताशी 40 ते 50 किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. नागरिक आणि शेतकऱ्यांना आवाहन राज्यातील बहुतांश भागांत उष्णता, दमट वातावरण आणि अधूनमधून वादळी पावसाची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, तर शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज आणि कृषी विभागाच्या सल्ल्यानुसारच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## आजपासून दिवसाआड पाणीपुरवठा; धरणसाठा घटल्याने महापालिकेचा कडक निर्णय

**पुणे : वृत्तसंस्था**

पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी आहे. पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी न लावल्याने आणि धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने पुणे महापालिकेने आजपासून म्हणजेच सोमवार १५ जूनपासून शहरात दिवसाआड पाणीपुरवठा लागू करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. १५ जून उलटूनही मॉन्सून सक्रिय न झाल्याने प्रशासनावर पाणी वापरावर निर्बंध आणण्याची वेळ आली आहे.

**सम-विषम तारखांनुसार पाणीपुरवठ्याचे नवीन नियोजन :**

पावसाचा विलंब आणि वाढती पाणीटंचाई लक्षात घेऊन महापालिकेने सम-विषम तारखांनुसार पाणीपुरवठ्याचे नवीन नियोजन जाहीर केले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना आता दिवसाआडच नळाचे पाणी मिळणार असून, अनेक भागांमध्ये पाणीबाणीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नागरिकांना त्यांच्या भागाचे सविस्तर वेळापत्रक महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येणार आहे. यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आधीच वर्तवण्यात आली होती. सध्या पुणे महापालिका दररोज सुमारे १६०० एमएलडी पाणीपुरवठा करते. मात्र उपलब्ध साठा ऑगस्टपर्यंत पुरवण्यासाठी हा पुरवठा ११०० ते १२०० एमएलडीपर्यंत कमी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, भामा-आसखेड प्रकल्पातून पाणी मिळणाऱ्या उत्तर-पूर्व पुण्यातील काही भागांना तांत्रिक कारणांमुळे सध्या या कपातीमधून वगळण्यात आले आहे. त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

**महापालिकेचे नागरिकांना आवाहन :**

महापालिकेने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. नळ व टाक्यांची गळती तातडीने दुरुस्त करणे, अनधिकृत नळजोडांची माहिती प्रशासनाला देणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. पाणीपुरवठ्याबाबत तक्रारींसाठी हेल्पलाइन क्रमांक १८००-१०३०-२२२ उपलब्ध करण्यात आला आहे.

तसेच पाणीटंचाईचा गैरफायदा घेऊन कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या किंवा अवाजवी दर आकारणाऱ्या खासगी टँकरचालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. मॉन्सूनची प्रतीक्षा आणि घटता धरणसाठा यामुळे पुणेकरांसमोर पाणी व्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे राहिले असून, पुढील काही आठवडे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

**जाणून घ्या कोणत्या भागात कधी पाणी येणार :**

पहाटे आणि सकाळी पाणी येणारे भाग: शहरातील काही महत्त्वाच्या भागांमध्ये पहाटेपासूनच पाणीपुरवठा सुरू होणार आहे. यामध्ये बोपोडी परिसरात सकाळी ४.०० ते १०.०० या वेळेत पाणी येईल. धाकुडवस्ती, कपिल मल्हार परिसर आणि बाणेर गावठाण भागात सकाळी ४.३० ते ८.३० अशी वेळ असेल, तर सुतारवाडी गावठाण आणि पाषाण पार्क भागात पहाटे ४.३० ते ७.३० या वेळेत पाणी मिळेल. आपटे रोड, भांडारकर रोड, प्रभात रोड, लॉ कॉलेज रोड, पुलाची वाडी, शिवाजीनगर गावठाण, वैकुंठ स्मशान परिसर, समप म भवन, अमर सोसायटी, कोपन गल्ली, मोढ कॉलनी, विठ्ठलवाडी, माकेकर प्लॉट, राजपूत वसाहत आणि एरंडवणे गावठाण या भागात पहाटे ५.०० ते ११.०० या वेळेत पाणीपुरवठा केला जाईल. खडकी छावणी भाग आणि मुळा रोड परिसरात सकाळी ६.०० ते ११.३० अशी वेळ देण्यात आली आहे. याशिवाय सुतारगाव भागात सकाळी ७.३० ते ९.३०, मोहननगर भागात पहाटे ७.३० ते १२.३० आणि एसटीएम, अभिमानश्री सोसायटी व चतु:शृंगी नगर परिसरात सकाळी ८.०० ते दुपारी ३.०० या वेळेत नळाला पाणी येईल.

संपादकीय

## शाळेतील पहिल्या दिवसाच्या स्वागताचा उत्सव : 'शाळा प्रवेशोत्सव'

राज्यातील सर्व मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविणे तसेच शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्सवात रूपांतर करणे या उद्देशाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण असल्याने या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी वातावरणात केल्यास त्यांचा उत्साह द्विगुणित होईल आणि शैक्षणिक वर्षाची सुरूवात अत्यंत उत्साही आणि आनंददायी वातावरणात होईल. यासाठी विदर्भातील शाळा वगळता उर्वरित महाराष्ट्रात यंदाचा 'शाळा प्रवेशोत्सव' 15 जून 2026 रोजी साजरा करण्यात येणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. या पार्श्वभूमीवर शाळा प्रवेशोत्सव हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, पालकांचा विश्वास दृढ करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शालेय शिक्षण विभागाने शाळा प्रवेशोत्सवासाठी व्यापक नियोजन केले असून राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील सदस्य, लोकप्रतिनिधी तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी राज्यभरातील विविध शाळांना भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. मागील वर्षी राबविण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सवामुळे शाळांमधील पटसंख्येतील घट कमी होण्यास मदत झाली. काही जिल्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत पटसंख्येत वाढही दिसून आली. या सकारात्मक परिणामांच्या आधारे यंदा अधिक व्यापक आणि परिणामकारक पद्धतीने हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शाळा प्रवेशोत्सवांतर्गत प्रत्येक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले जाणार आहे. 'पहिले पाऊल' या संकल्पनेअंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचा ठसा घेऊन त्याची प्रत पालकांना दिली जाणार आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण करण्यात येणार असून शाळेचा पहिला दिवस उत्सवाप्रमाणे साजरा केला जाणार आहे.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची सक्रिय भूमिका निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्याने किमान एका शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करायचे असून संबंधित अधिकाऱ्यांनी शाळा वर्षभरासाठी 'दत्तक शाळा' म्हणून स्वीकारून तेथील शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घ्यायचा आहे. यामुळे शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी परिसरातील अंगणवाडी व बालवाडी केंद्रांना भेट देऊन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावी, पालकांशी संवाद साधावा आणि शासकीय शाळांमधील विविध सुविधा, शिष्यवृत्ती, नाविन्यपूर्ण उपक्रम यांची माहिती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. समाजमाध्यमे, ग्रामस्तरीय जनजागृती, दवंडी आणि पालकांच्या व्हॉट्सॲप गटांद्वारेही शाळा सुरू होण्याबाबत व्यापक प्रचार-प्रसार करण्यात येणार आहे.

यंदाच्या प्रवेशोत्सवासाठी जिल्हास्तरावर विशेष नियंत्रण व्यवस्था उभारण्यात आली असून 'शाळा प्रवेशोत्सव कक्ष' स्थापन करून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवले जाणार आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या शाळा भेटींची माहिती, छायाचित्रे आणि अहवाल ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदविले जाणार आहेत. शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो. शाळा प्रवेशोत्सव 2026 हा उपक्रम विद्यार्थ्यांचे शाळेशी नाते अधिक दृढ करण्याबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षण, वाढती उपस्थिती आणि सक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शासन, प्रशासन, शिक्षक, पालक आणि समाज यांच्या संयुक्त सहभागातून प्रत्येक बालक शिक्षणाच्या प्रवाहात यावे, हा या उपक्रमामागील मूलभूत हेतू असून त्याद्वारे 'शिक्षणसमृद्ध महाराष्ट्र' घडविण्याच्या दिशेने आणखी एक सकारात्मक पाऊल टाकले जात आहे.



# वृद्धांचा सन्मान : अत्याचारमुक्त समाजाची गरज : डॉ. राजेंद्र बगाटे

१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई-वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. "मातृदेवो भव, पितृदेवो भव" ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.

वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.

शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो.

आर्थिक अत्याचार हा आजच्या काळात वृद्धांवरील अत्याचाराचा अत्यंत गंभीर प्रकार ठरत आहे. वृद्ध व्यक्तींच्या संपत्तीवर बळजबरीने ताबा मिळविणे, त्यांच्या पेन्शन किंवा बचतीचा गैरवापर करणे, फसवणूक करून कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे किंवा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक वृद्ध व्यक्ती आर्थिकदृष्ट्या आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा भावनिक कारणांमुळे अशा अत्याचाराविरोधात आवाज उठवत नाहीत.

दुर्लक्ष हा वृद्ध अत्याचाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. वृद्ध व्यक्तींना वेळेवर अन्न न देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी न घेणे, औषधोपचार टाळणे किंवा त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना कुटुंबामध्ये पूर्णपणे एकटे पाडले जाते, त्यांच्याशी संवाद साधला जात नाही किंवा त्यांना ओझे समजले जाते. हे दुर्लक्षही अत्याचाराचेच एक रूप आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते. वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते.

अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कंटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात.



- डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.

भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यापैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणामार्फत आर्थिक सहाय्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते.

कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक आहे. पिढ्यांमधील संवाद वाढविणारे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीला वृद्धांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेता येईल. माध्यमांनीही वृद्धांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत सकारात्मक जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे.

डिजिटल युगात वृद्ध व्यक्तींना तंत्रज्ञानाची माहिती करून देणेही महत्त्वाचे ठरते. ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर राहणाऱ्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे आणि सामाजिक संबंध टिकवून ठेवणे शक्य होते.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे. आजचे वृद्ध हे कालचे समाजनिर्माते, कुटुंबाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक आहेत. त्यांच्या कष्टामुळे आणि त्यागामुळे अनेक पिढ्या घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे किंतपत लक्ष देतो आणि त्यांना किंतपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे. vसमाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.

१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल. आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे 'वृद्धांचा आदर - अत्याचाराला नकार' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.

# संघर्षातून साकारलेला उद्योजकतेचा दीपस्तंभ

### युवा उद्योजक बाबासाहेब ठोंबरे यांना वाढदिवसानि-मित्त अभिष्टचिंतन

**काही व्यक्ती जन्माने मोठ्या नसतात, तर आपल्या कर्तृत्वाने मोठ्या होतात. काहींच्या वाट्याला संपन्नता येते, तर काहींच्या वाट्याला संघर्ष; पण संघर्षालाच संधी मानून जो पुढे चालत राहतो, त्याच्याच नावाने यशाचा इतिहास लिहिला जातो. अशाच कर्तृत्ववान, दूरदर्शी आणि जिद्दी व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे युवा उद्योजक बाबासाहेब ठोंबरे.**

डोंगरदरीच्या सानिध्यात वसलेल्या देऊळगाव घाट या डोंगराळ भागातील मातीत त्यांचा जन्म झाला. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या गावात रोजगाराच्या संधी मर्यादित होत्या. हालाखीची परिस्थिती, मर्यादित साधने आणि अनेक अडचणी त्यांच्या वाट्याला आल्या. शिक्षणाची आवड असूनही परिस्थितीच्या ओझ्याखाली अनेक स्वप्ने दडपली गेली. दहावीमध्ये अपेक्षित यश मिळूनही नोकरीची दारे त्यांच्यासाठी उघडली नाहीत.

परंतु संकटांपुढे हार मानणे त्यांच्या स्वभावात नव्हते. नोकरीच्या शोधात आयुष्य घालवण्यापेक्षा त्यांनी स्वतःचा मार्ग निवडला. पनवेलच्या भूमीत सुरू झालेला छोटासा व्यवसाय आज मोठ्या उद्योगसमूहात रूपांतरित झाला आहे. कष्ट हे त्यांचे भांडवल, प्रामाणिकपणा हा त्यांचा पाया आणि दूरदृष्टी ही त्यांची ताकद ठरली.



खऱ्या अर्थाने हा "नोकरीच्या शोधातून रोजगारनिर्मितीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास" आहे. ज्यांच्या वाट्याला कधीकाळी रोजगाराची संधी आली नाही, तेच आज अनेकांच्या हाताला काम देणारे ठरले आहेत. ही केवळ आर्थिक यशोगाथा नसून सामाजिक बांधिलकीचीही प्रेरणादायी कहाणी आहे.

### संत तुकाराम महाराज म्हणतात

■ **"असाध्य ते साध्य करिता सायास ।"**

या वचनाचा प्रत्यय बाबासाहेबांच्या जीवनप्रवासात प्रत्येक पावलावर येतो. परिस्थितीच्या दगडांवर त्यांनी परिश्रमांची छिन्नी चालवली आणि यशाचे सुंदर शिल्प घडवले. म्हणूनच त्यांचा प्रवास म्हणजे "जिद्दीच्या जोरावर घडवलेले यशाचे साम्राज्य" असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

आज बाबासाहेब ठोंबरे यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे जिद्दीचा झरा, कष्टांचा डोंगर आणि यशाचा दीपस्तंभ आहे. त्यांच्यातील चाणाक्ष व्यावसायिक, समाजाभिमुख नागरिक आणि माणुसकी जपणारा मित्र यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो. यशाच्या उंच शिखरावर पोहोचूनही त्यांचे पाय जमिनीवर आहेत, हीच त्यांच्या महानतेची खरी ओळख आहे.

गर्भगीरी च्या कुशीत वाढलेल्या या सुपुत्राने आज कर्तृत्वाचे असे शिखर गाठले आहे की, त्यांचा जीवनप्रवास अनेक युवकांसाठी दिशादर्शक ठरला आहे. त्यामुळेच ते केवळ उद्योजक नसून "संघर्षातून साकारलेला उद्योजकतेचा दीपस्तंभ" म्हणून समाजासमोर उभे आहेत.

### संत ज्ञानेश्वर माऊलींचे शब्द येथे अत्यंत समर्पक वाटतात

- **"जो जे वांछील तो ते लाहो."**
- **स्वतःची स्वप्ने पूर्ण करताना इतरांच्या आयुष्यातही आशेचा किरण निर्माण करणाऱ्या बाबासाहेब ठोंबरे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा.**
- **ईश्वरचरणी प्रार्थना की, त्यांच्या उद्योगाला उत्तरोत्तर भरभराट लाभो, समाजसेवेचा वसा अधिक बळकट होवो आणि यशाची नवी क्षितिजे त्यांच्या स्वागतासाठी सदैव खुली राहोत.**
- **"संघर्ष ज्यांचा गुरू, कष्ट ज्यांची पूजा आणि कर्तृत्व ज्यांची ओळख — असे व्यक्तिमत्त्व म्हणजे बाबासाहेब ठोंबरे."**
- **वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**

- **लेखन पत्रकार..**
- **आदिनाथ ठोंबरे.**
- **बीड.**
- **7620890299**

## विदर्भात महायुतीचीच आघाडी

महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. सत्ताधारी महायुतीने संघटनात्मक ताकद आणि स्थानिक पातळीवरील संख्याबळाच्या जोरावर आघाडी घेतल्याचे चित्र आहे. त्यामुळे विदर्भातील बहुतांश मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार सरस ठरण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात सध्या विधान परिषदेसाठी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून द्यायच्या १७ उमेदवारांसाठी निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्यात विदर्भातील पाच जागा आहेत. या पाच जागांमध्ये नागपूर मतदारसंघ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली मतदारसंघ, अमरावती मतदारसंघ, यवतमाळ मतदारसंघ, आणि भंडारा, गोंदिया मतदारसंघ अशा पाच मतदारसंघांतून आमदार निवडायचे आहेत.

या पाच जागांपैकी वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ या दोन मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज मागे घ्यायच्या दिवशी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी आणि इतर उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्यामुळे दोन्ही ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात यवतमाळमध्ये शिवसेनेचे दुष्यंत चतुर्वेदी हे दुसऱ्यांदा या मतदारसंघातून विजयी झाले आहेत, तर वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली मतदारसंघातून भाजपचे अरुण लखानी हे बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यामुळे आता नागपूर, भंडारा, गोंदिया आणि अमरावती या तीन मतदारसंघांमध्ये लढत होत असून १८ जून रोजी मतदान होऊन इथल्या उमेदवारांचे भवितव्य पेटीबंद होणार आहे. बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये अरुण लखानी हे उद्योगपती असून संघ परिवाराशी संबंधित आहेत.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथ व बेघरांना अन्नदान; वयोवृद्ध मायमाऊलींचे भरभरून आशीर्वाद

## वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत राजसाहेबांचा वाढदिवस साजरा– वर्षाताई जगदाळे

**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजाभिमुख उपक्रम राबवत बीड येथील जिव्हाळा अनाथ व बेघर निवारा केंद्रामध्ये अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे निवारा केंद्रातील वयोवृद्ध, निराधार आणि बेघर नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले.

समाजातील वंचित, गरजू आणि निराधार घटकांप्रती संवेदनशीलता जपत राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. अन्नदानाच्या माध्यमातून केवळ पोटाची भूक भागली नाही, तर आपुलकी, प्रेम आणि माणुसकीचा स्पर्शही या वृद्धांना अनुभवायला मिळाला. अनेक मायमाऊलींनी भावुक होत राजसाहेब ठाकरे यांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी मनःपूर्वक प्रार्थना करत भरभरून आशीर्वाद दिले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही समाजातील दुर्लक्षित घटकांच्या सेवेसाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे सांगितले. वाढदिवस साजरा करण्याचा हा आदर्श आणि समाजोपयोगी मार्ग असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

या प्रसंगी सिटीजनचे उपसंपादक देवेंद्र ढाका, दैनिक बीड प्रसारचे संपादक काझी समीरोद्दीन, फास्ट अपडेटचे पत्रकार नवीद इनामदार, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे, महिला उपजिल्हाध्यक्ष कल्पना कवठेकर, तसेच जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, अभिजीत वैद्य आणि छायाताई सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते.

राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या अन्नदान उपक्रमाने माणुसकीचे सुंदर दर्शन घडविले. समाजातील गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा प्रयत्न सर्वांच्या मनाला स्पर्शून गेला आणि वाढदिवसाचे औचित्य अधिक अर्थपूर्ण ठरले.




# मातोरीत शिवसेनेने केली कर्जमाफी निर्णयाची होळी

**शिरूर कासार |** सरकारने काढलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेच्या निर्णयात शेतकऱ्यांची घोर फसवणूक करण्यात आली आहे. अटी-शर्तींमध्ये गुंतवण्यात आलेल्या या कर्जमाफीमुळे अनेक शेतकऱ्यांवर सरकार अन्याय करु पाहत आहे. परंतु शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष हे कदापी होऊ देणार नाही. सरकारने कर्जमाफीचा काढलेला फसवा शासन निर्णय तातडीने रद्दन करुन शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देणारा आदेश काढावा. यासाठी रविवार (१४ जून) रोजी शिरूर तालुक्यातील मातोरी येथे शिवसैनिक आक्रमक झाले होते.




सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करुन शिवसैनिकांनी शासनाच्या कर्जमाफीच्या आदेशाची होळी करुन निषेध केला. किसान सेनेचे तालुका प्रमुख हरी खेडकर, सर्कलप्रमुख प्रवीण घाटे यांनी सरकारच्या कर्जमाफी ही कागदोपत्री आहे. याचा शेतकऱ्यांना तीळमात्र फायदा होणार नाही अशी टिका केली. निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने "सातबारा कोरा करू" असे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफी योजनेत विविध अटी व शर्ती लावून शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र रचण्यात आल्याचा आरोपही यावेळी त्यांनी केला.

शेतकऱ्यांची सरसकट विना अट कर्जमाफी तात्काळ जाहीर करावी, अन्यथा शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली शिरूर कासार तालुक्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा हरी मामा खेडकर व प्रवीण घाटे यांनी दिला.

या आंदोलनात प्रवीण गहिनीनाथ घाटे (सर्कल प्रमुख, घाटशीळ-पारगाव), हरी मामा खेडकर , अमोल जरांगे, बालाजी ढवळे, सार्थक येवले, ज्ञानेश्वर जरांगे, अरुण जरांगे, शिवशंकर येवले, ज्ञानेश्वर शेंबडे, लखन माने, अजय येवले, ज्ञानेश्वर माने, विजय जरांगे आदी कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

मातोरी येथील आंदोलनात करण्यात आलेल्या घोषणाबाजीतून सरकारच्या बाबतीत शेतकऱ्यांमध्ये असलेला संताप दिसून आला. शेतकऱ्यांना सरकारने देशोधडीला लावले असल्याची भावना आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या.

# बीडमधील 167 पैकी 14 लघु प्रकल्प कोरडे

**बीड |** जून महिना सुरू होऊनही अद्याप पावसाने दडी मारल्यामुळे बीड जिल्ह्यावरील पाणीटंचाईचे संकट जवळ येऊ लागले आहे. जिल्ह्यातील लहान-मोठ्या अशा एकूण १६७ धरण प्रकल्पांमध्ये मिळून आता केवळ १७.२५ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. जिल्ह्यातील तब्बल ७९ लघु प्रकल्प जोत्याच्या खाली गेली असून, १४ पाणीसाठा प्रकल्प पूर्णपणे कोरडे ठाक पडले आहेत. पाऊस लांबल्याने प्रशासनासह बळीराजाच्या चिंतेत मोठी भर पडली आहे.

जिल्ह्यातील धरणांची एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता ७६९.६७१ दलघमी इतकी आहे, मात्र सध्या त्यापैकी केवळ १३२.७६२ दलघमी (१७.२५%) पाणीसाठा उपलब्ध आहे. सद्यस्थितीत धरणांमधील एकूण पाणीसाठा (मृत साठ्यासह) ३३३.२२२ दलघमी इतका आहे.



प्रकल्पांच्या प्रकारानुसार विचार केल्यास, जिल्ह्यातील १ मध्यम प्रकल्पामध्ये सध्या २४.८६% उपयुक्त पाणीसाठा आहे, तर एकूण २३ लघु व कोल्हापुरी बंधारे मिळून त्यामध्ये केवळ ८.२२% उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांपैकी ३ प्रकल्प पूर्णपणे कोरडे झाले आहेत. यात पाटोदा तालुक्यातील महासांगवी, आष्टी तालुक्यातील कांबळी आणि केज तालुक्यातील वाघे बाभुळगाव या प्रकल्पांचा समावेश आहे.

# राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसेकडून 59 वृक्षांचे वृक्षारोपण







परळी | प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विविध प्रकारच्या एकूण 59 वृक्षांची लागवड करण्यात आली.

पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात कार्यकर्त्यांनी श्रमदानातून वृक्षारोपण केले. लागवड करण्यात आलेल्या वृक्षांमध्ये आंबा, चिंच, सीताफळ, करंज, कदंब, इंग्रजी चिंच, फापडा आदी स्थानिक तसेच पर्यावरणपूरक प्रजातींचा समावेश होता.

राजसाहेब ठाकरे यांची पर्यावरणाबाबत असलेली जागरूकता आणि संवेदनशील भूमिका लक्षात घेऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. वृक्षारोपणाबरोबरच या झाडांचे संगोपन करण्याचाही निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता दहिवाळ, तालुका अध्यक्ष श्रीकांत पाथरकर, तालुका उपाध्यक्ष विठ्ठलदादा झीलमेवाड, शहर उपाध्यक्ष प्रशांत कामाळे, ऋषी बारगजे, विद्यार्थी सेना जिल्हा उपाध्यक्ष हनुमान सातपुते, माणिक लटंगे, महेश शिवगण, लक्ष्मण शिंदे, गुरु बळवंत, धनराज आवाड, राहुल गायकवाड, प्रमोद मुंडे, आत्माराम खांदारकर यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत भविष्यातही सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, सोमवार 15 जून 2026



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तपपूर्ती निमित्त ना. पंकजाताई मुंडे यांनी सोमठाण्यात केली महाआरती

## रेणुकामाता मंदिराला तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा देण्यासाठी प्रयत्नशील ; मंदिर परिसरात केले वृक्षारोपण





जालना | प्रतिनिधी

सोमठाणा (ता. बदनापूर) येथील श्रीक्षेत्र रेणुकामाता मंदिराला तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा देण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीला बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या हस्ते आज महाआरती आणि मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

ना. पंकजाताई मुंडे आज जालना दौऱ्यावर आल्या होत्या.छत्रपती संभाजीनगर येथून जालन्याकडे जाताना रस्त्यात बदनापूर तालुक्यातील सोमठाणा येथील श्रीक्षेत्र रेणुकामाता मंदिरात त्यांनी महाआरती केली. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विकासाचे एक तप पूर्ण केले आहे, तळागाळातील सर्व सामान्य माणसाच्या विकासाचा संकल्प पूर्ण करणाऱ्या नेतृत्वाच्या पाठिशी आपण खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन त्यांनी केले. राज्याच्या सुख-समृद्धीसाठी देखील त्यांनी यावेळी प्रार्थना केली. याप्रसंगी मंदिर ट्रस्टने केलेल्या मागणीनुसार मंदिराच्या विकासासाठी आपण कटिबध्द आहोत असे सांगून नवरात्रोत्सवात पुन्हा एकदा दर्शनाला येऊ असा शब्द त्यांनी दिला. आ. नारायण कुचे, प्रवीण घुगे, सतीश नागरे, बद्रीनाथ पठाडे आदी यावेळी उपस्थित होते. मंदिर ट्रस्टच्या वतीने याप्रसंगी ना. पंकजाताईंचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्या वृक्ष लागवड देखील करण्यात आली.

# रोहित पवार यांच्या अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलनात दीपक देशमुख यांचा सहभाग; गौतम आगळे यांचा जाहीर पाठिंबा

परळी / पंढरपूर | प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला दिवसेंदिवस व्यापक पाठिंबा मिळत असून, परळी नगरीचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख तसेच रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव गौतम आगळे यांनी आंदोलनस्थळी भेट देत आपला जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी राज्य सरकारसमोर शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. 2019 च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ 50 हजार रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीची मर्यादा रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच एकवेळ समझोता (OTS) योजनेतही ही अन्यायकारक अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय, 2 लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना आधी उर्वरित रक्कम भरण्याची अट न घालता थेट 2 लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी लागू करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग दोन वर्षे नियमित कर्जफेडीची अट रद्द करावी, तसेच 2017 च्या कर्जमाफीसाठी पात्र असूनही कागदपत्रांच्या त्रुटींमुळे वंचित राहिलेल्या 6.56 लाख शेतकऱ्यांना तातडीने



कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशीही मागणी करण्यात आली.

शेतकरी हिताच्या दृष्टीने पीकविमा योजनेतील शेतकरीविरोधी जाचक अटी व ट्रिगर काढून टाकून 1 रुपयांत पीकविमा योजना पुन्हा सुरू करावी, तसेच पेरणीपूर्वी कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांच्या खात्यात आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून त्यांना पेरणीसाठी आर्थिक मदत मिळू शकेल, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनस्थळी बोलताना दीपक देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त असून शासनाने त्याची गंभीर दखल घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, असे सांगितले. तर गौतम आगळे यांनी शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी रोजंदारी मजदूर सेना खंबीरपणे आंदोलनाच्या पाठीशी उभी राहील, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी परिसरातील विविध संघटनांचे पदाधिकारी,मुन्ना केशव मस्के व कार्यकर्ते, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# ग्रामीणमधून बसवराज पाटील यांना विक्रमी मताधिक्य देणार आ. रमेशआप्पा कराड यांची ग्वाही



लातूर | प्रतिनिधी

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांना लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून अपेक्षेपेक्षाही मोठे मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार भाजपाचे नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केला.

रविवारी सकाळी लातूर येथील 'प्रयाग' या निवासस्थानी बसवराज पाटील यांनी सदिच्छा भेट देत लातूर ग्रामीण मतदारसंघातील मतदार व लोकप्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बसवराज पाटील व आ. अभिमन्यू पवार यांचा सत्कार करून स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांबरोबरच इतर घटकांनाही सोबत घेत महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांना लातूर ग्रामीणमधून मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.

आमदार अभिमन्यू पवार यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी बसवराज पाटील यांचा विजय महत्त्वाचा असल्याचे सांगितले. तर बसवराज पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पक्ष नेतृत्वाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्याचा निर्धार व्यक्त करत, मतदारांनी मतदानरूपी आशीर्वाद देऊन विकासकामांसाठी संधी द्यावी, असे आवाहन केले.

बैठकीदरम्यान बसवराज पाटील यांनी उपस्थित प्रत्येक मतदाराशी संवाद साधत त्यांच्या अपेक्षा व सूचनाही जाणून घेतल्या.

या बैठकीस भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, छायाबाई चिंचोलकर, मोनिका सूर्यवंशी, शरद देरेकर, अभिषेक अकनगिरे, खैरुनिसा आत्तार यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोसंबीला भाव नाही; 450 झाडांवर चालवला जेसीबी

**पिंपळगाव** | सिल्लोड तालुक्यातील पिंपळगाव पेठ येथील शेतकरी खेमचंद फुले यांनी मोसंबी पिकाला मिळत असलेल्या अत्यल्प दरामुळे आपल्या शेतातील ४५० मोसंबीच्या ओल्या झाडांवर जेसीबी चालवून संपूर्ण बाग उद्ध्वस्त केली. २०२१ मध्ये एक हेक्टर क्षेत्रावर मोठ्या अपेक्षेने मोसंबीची लागवड करण्यात आली होती. मात्र चार वर्षे सतत पाणी, खत, औषधे, मजुरी आणि देखभालीवर लाखो रुपये खर्च करूनही बाजारात मोसंबीला केवळ १५ ते २० रुपये प्रतिकिलो दर व यावर्षी तर फक्त ८ रुपये किलोने मोसंबी विकण्याची नामुष्की त्यांच्यावर आली. बाजारात कमी दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले होते. अखेर आर्थिक विवंचनेतून हा टोकाचा निर्णय घ्यावा लागल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

खेमचंद फुले यांनी सांगितले की, मोसंबी बाग उभी करण्यासाठी सुरुवातीच्या काळात ठिबक सिंचन, रोपे, कुंपण, औषध फवारणी, पाणी व्यवस्थापन यावर मोठा खर्च झाला. गेल्या चार वर्षांत हवामानातील सततच्या बदलांमुळे रोगराई आणि फळगळ यांचाही सामना करावा लागला. त्यातूनही उत्पादन चांगले आले; मात्र बाजारात व्यापाऱ्यांकडून अत्यल्प दर देण्यात येत असल्याने शेती करणे परवडेनासे झाले. सध्या रासायनिक खते, कीटकनाशके, मजुरी, वीज आणि वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली आहे. मोसंबी तोडणीसाठी मजूर उपलब्ध होत नसल्याने मजुरीचे दरही वाढले आहेत. अशा परिस्थितीत १५ ते २० रुपये किलो व यावर्षी ८ रु किलो दराने माल विकल्यानंतर हातात काहीच राहत नसल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली. अनेक वेळा बाजार समित्यांमध्ये माल नेण्यासाठी लागणारा वाहन खर्चही निघत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

**मोसंबी पिकाला हवामान बदलाचाही फटका**

गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, वाढते तापमान आणि पाण्याची टंचाई यामुळे फळबागांना मोठा फटका बसत आहे. मोसंबी बाग टिकवण्यासाठी नियमित सिंचन आवश्यक असते. मात्र विजेचे वाढते बिल आणि पाण्याची कमतरता यामुळे बाग सांभाळणे कठीण होत चालले आहे. तज्ज्ञांच्या मते, उत्पादन वाढत असताना बाजारपेठ आणि प्रक्रिया उद्योगांचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नाही.

